**रोजगार हमी योजनेअंतर्गत फलोत्पादन कार्यक्रमाकरिता विशेष घटक योजनेंतर्गत अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांसाठी पतमर्यादा मंजूरीबाबत**

महाराष्ट्र शासन,
नियोजन विभाग,
शासन निर्णय क्रमांक – फळबाग -२०१७/प्र.क्र.१०/रोहयो-५.
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : २७ मार्च, २०१७.

**वाचा :-**

१. कृषि व पशुसंवर्धन ,दुग्ध व्यवसाय विकास, व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक- फलायो-२०११/ प्र.क्र.६५/ ९-अे, दिनांक २०/७/२०११
२. शासन परिपत्रक, नियोजन विभाग, क्रमांक- योजना २०१३ /प्र.क्र.६९/ रोहयो-५ दिनांक २६.८.२०१३
३. शासन परिपत्रक,वित्त विभाग,क्रमांक- अंदाज २०१४/ प्र.क्र.११०/अर्थसंकल्प-३ दिनांक १.७.२०१४.
४. जिल्हाधिकारी, ठाणे यांचे पत्र क्र. मग्रारोहयो/लेखा/कावि-९६६/१६ दिनांक ०५.११.२०१७
५. जिल्हाधिकारी, यवतमाळ, यांचे पत्र क्र. –रोहयो/सलेअ/फळबाग/१९/२०१७, दिनांक ३१.१.२०१७
६. जिल्हाधिकारी, जळगांव यांचे पत्र क्र.-रोहयो/सलेअ/कावि/फळबाग/४९/२०१७, दिनांक ७.३.२०१७.
७. जिल्हाधिकारी, सांगली, यांचे पत्र क्र. जा.क्र.तंत्र/रोहयो/प.म/३९३/२०१७, दिनांक २७.१.२०१७
८. जिल्हाधिकारी, नागपूर यांचे पत्र क्रमांक रोहयो/सलेअ/कावि.२५/२०१७, दिनांक १०.२.२०१७.

**प्रस्तावना :-**

रोजगार हमी योजनेशी निगडीत फळबाग लागवडीसाठी जिल्हाधिकारी, ठाणे, यवतमाळ, जळगांव, सांगली, नागपूर यांनी सन २०१६-१७ या वर्षात रू.२०.२१ लक्ष (अक्षरी रुपये वीस लक्ष एकवीस हजार फक्त) इतक्या निधीची अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांसाठी मागणी संदर्भीय क्र.४ ते ८ अन्वये शासनाकडे केली आहे. त्या अनुषंगाने उपरोक्त जिल्ह्यांस निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

रोजगार हमी योजनेअंतर्गत फलोत्पादन कार्यक्रमासाठी जिल्हाधिकारी, ठाणे, यवतमाळ, जळगांव, सांगली, नागपूर यांनी सन २०१६-१७ या वित्तीय वर्षाकरीता अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांसाठी केलेल्या निधी मागणीस अनुसरून खाली दर्शविल्याप्रमाणे रू.२०.२१ लक्ष (अक्षरी रुपये वीस लक्ष

एकवीस हजार फक्त) इतक्या निधीची अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांसाठी पतमर्यादा रोजगार हमी योजनेच्या निधीमधून मंजूर करण्यात येत आहे.

**( अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांसाठी )** (रुपये लाखात)

| अ.क्र. | जिल्हा | निधी मागणी | मंजुर निधी |
|---|---|---|---|
| १. | ठाणे | ०.४७ | ०.४७ |
| २. | यवतमाळ | १.६६ | १.६६ |
| ३. | जळगांव | १.०९ | १.०९ |
| ४. | सांगली | १२.०६ | १२.०६ |
| ५. | नागपूर | ४.९३ | ४.९३ |
| | **एकुण** | **२०.२१** | **२०.२१** |

२. सदर पतमर्यादेचे वाटप रोजगार हमी योजनेच्या संबंधित आहरण व संवितरण अधिका-यांकडे करण्याबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी ठाणे, यवतमाळ, जळगांव, सांगली व नागपूर यांनी तात्काळ करावी. तथापि, यापूर्वी संबंधित जिल्ह्यांस मंजूर केलेली परंतू खर्च न झालेली पतमर्यादा तात्काळ शासकीय कोषगारात विहित कार्यपध्दतीनुसार जमा करण्यात आल्याची खातरजमा करण्यात यावी. तसेच यापूर्वी वितरीत केलेल्या निधीची उपयोगिता प्रमाणपत्रे तात्काळ शासनास सादर करावीत. पतमर्यादेचे वाटप अर्थसंकल्प वितरण प्रणालीद्वारा करण्यात येत आहे.

३. सदर निधी फक्त अनुसूचीत जातीच्या लाभार्थ्यांना वाटप करावयाचा आहे. अनुसूचीत जातीच्या लाभार्थ्यांखेरीज इतर लाभार्थ्यांना या निधीचे वाटप करण्यात येवू नये. निधीचे वाटप केल्यानंतर लाभार्थी निहाय खर्चाच्या तपशिलाची माहिती शासनास सादर करावी. व त्याची एक प्रत समाज कल्याण अधिकारी यांना देण्यात यावी.

४. अमरावती जिल्ह्यांस यापूर्वी मंजूर केलेल्या निधीची उपयोगिता प्रमाणपत्रे (U.C.) व खर्च ताळमेळ (A.G. Reconciliation) विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत तात्काळ शासनास सादर करावा, या अटीच्या अधीन राहून सदर पतमर्यादा मंजूर करण्यात येत आहे.

५. यासाठी येणारा खर्च नियोजन विभाग, "मागणी क्रमांक ओ-३, २५०५ ग्रामीण रोजगार, ६०- इतर कार्यक्रम, ००१- रोजगार हमी योजना, पंचवार्षिक योजनाअंतर्गत योजना (०१) रोजगार हमी योजना (०१) (०६) फलोत्पादन कार्यक्रम, (विशेष घटक योजना) (२५०५ २९१८), ३१- सहाय्यक अनुदाने " या उपलेखाशिर्षाखालील सन २०१६-१७ या वित्तीय वर्षातील मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

६. सदर आदेश नियोजन विभागाचा अनोपचारिक संदर्भ क्रमांक १९६/का.१४३४, दिनांक १५.७.२०१३ व वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक ३३८/१३/व्यय-८, दिनांक २.८.२०१३ अन्वये दिलेल्या

सहमती व मान्यतेच्या अनुषंगाने, नियोजन विभागाने क्रमांक योजना – २०१३/प्र.क्र.६९/रोहयो-५, दिनांक २६.८.२०१३ अन्वये निर्गमित केलेल्या शासन परिपत्रकानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.**

(डॉ. प्रमोद शिंदे)
उप सचिव (रोहयो)

प्रति,

१. जिल्हाधिकारी, ठाणे, यवतमाळ, जळगांव, सांगली, नागपूर
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे, यवतमाळ, जळगांव, सांगली, नागपूर
३. संचालक, (फलोत्पादन), कृषि आयुक्तालय, पुणे
४. जिल्हा अधिक्षक, कृषि अधिकारी, ठाणे, यवतमाळ, जळगांव, सांगली, नागपूर.
५. महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता-१), मुंबई
६. महालेखापाल, महाराष्ट्र (लेखापरिक्षा-१), मुंबई
७. महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता-२), नागपूर
८. महालेखापाल, महाराष्ट्र (लेखापरिक्षा-२), नागपूर
९. विभागीय आयुक्त, कोकण, पुणे, नागपूर, अमरावती.
१०. जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे, यवतमाळ, जळगांव, सांगली, नागपूर
१२. सहायक संचालक, (लेखा) कार्यासन रोहयो-७.
१३. निवडनस्ती, रोहयो-५.